# वसई विरार शहर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दिनांक १४/०७/२०१६

## सकाळी ११.३० वा.

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>विषयाचे नाव</th><th>मा. स्थायी समिती सभेचा निर्णय</th></tr>
<tr><td>१</td><td>महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २० मधील तरतुदीनुसार मा. स्थायी समितीचे आठ सदस्य निवृत्त करणे.</td><td>ठराव :- सन्मा. सभापती , (स्थायी समिती) यांनी सभेत सुचविलेनुसार १६ (सोळा) स्थायी समिती सदस्यांच्या नावाच्या चिठ्ठयांमधून निहीत पद्धतीनुसार आठ सदस्यांच्या नावाच्या चिठ्ठया उचलणेत आल्या त्यांची नावे खालीलप्रमाणे
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>सदस्यांचे नाव</th><th>अ.क्र.</th><th>सदस्यांचे नाव</th></tr>
<tr><td>१</td><td>लॉरेल डायगो डायस</td><td>२</td><td>मिलींद जगन्नाथ घरत</td></tr>
<tr><td>३</td><td>प्रकाश दुमा रॉड्रीक्स</td><td>४</td><td>अब्दुल हक सुलेमान पटेल</td></tr>
<tr><td>५</td><td>उमेश दत्तात्रेय नाईक</td><td>६</td><td>मनिषा मनोहर जाधव</td></tr>
<tr><td>७</td><td>धनंजय विठ्ठल गावडे</td><td>८</td><td>कांता अनंत पाटील</td></tr>
</table>
उपरोक्त ०८ ही सदस्यांच्या निवृत्तीस मान्यता देण्यांत येत असून निवृत्त झालेल्या स्थायी समिती वरील आठ सदस्यांच्या जागी नव्याने नियुक्ती करणेकामीचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेपुढे सादर करावा, करीता आजची स्थायी समिती शिफारस करीत आहे.<br>
अनुमोदक :- मा.श्रीम. कांता पाटील   सूचक :- मा.श्री. प्रकाश रॉड्रीक्स</td></tr>
<tr><td>२</td><td>वसई-विरार शहर महानगरपालिकेत मालमत्ता कर विभागाची आखणी व बांधणे करणेसाठी मासिक पारिश्रमिक तत्वावर करारपद्धतीने श्री. किशोर जनार्दन चौधरी, सेवानिवृत्त सहाय्यक कर निर्धारक व संकलन अधिकारी गट-ब, बृहमुंबई महानगरपालिका यांची नेमणुक करणेकामी प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत.</td><td>ठराव :- प्रशासनाकडून सादर करण्यांत आलेल्या उपरोक्त प्रस्तावावर विचार विनिमय करण्यांत आला. दि. ८ जानेवारी, २०१६ च्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार श्री. किशोर जनार्दन चौधरी, सेवानिवृत्त सहाय्यक कर निर्धारक व संकलन अधिकारी यांची वसई-विरार शहर महानगरपालिकेत कर विभागाची आखणी व बांधणी करणेसाठी मासिक पारिश्रमिक तत्वावर प्रथम सहा महिन्यांसाठी करार पद्धतीने नेमणुक करण्यांत यावी, त्यांना शासन निर्णयातील अनुक्रमांक ९ मधील मर्यादेचे पालन करुन मासिक परिश्रमिक देण्यांत यावे. कामाची निकड विचारात घेऊन कराराचा कालावधी वाढविणे आवश्यक असल्यास त्याबाबतचा निर्णय मा. आयुक्त महोदयांनी त्यांचे स्तरावर घ्यावा. या नेमणुकीसाठी येणाऱ्या खर्चास ही स्थायी सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>
अनुमोदक :- मा.श्रीम.कांता पाटील  सूचक :- मा.श्री. प्रशांत राऊत</td></tr>
<tr><td>३</td><td>प्रभाग समिती ड, वॉर्ड नं. ६४ (९१) मध्ये गोखिवरे येथील मेन रोड ते रॉक चर्च पर्यंत</td><td>ठराव :- उपरोक्त निविदांची तुलना कमीत कमी दराची मे. हमीद जे. शेख यांची ८.७८% कमी दराची निविदा प्राप्त झ ालेली आहे. सदरची निविदा मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखापरिक्षक यांनी तपासून मंजूरीची शिफारस केली आहे. तरी महाराष्ट्र</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | पाईप गटार बांधणे कामी मंजुर निविदाधारकांबरोबर संविदा करणेस मान्यता देणेबाबत. | महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मे.हमिद जे.शेख यांच्याशी कामाची संविदा करण्यांस मान्यता देणेंत येत असून सदर कामी निविदा दराने येणाऱ्या खर्चानुसार अंतीम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम. मनिषा जाधव सूचक :- मा.श्री.किशोर पाटील** |
| ४ | वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती एच मधील वॉर्ड नं. १०० येथील आनंदनगर उद्यानात ओपन एअर फिश एक्वारीयम विकसीत करणे कामी मंजुर निविदाधारकांबरोबर संविदा करणेस मान्यता देणेबाबत. | **ठराव** :- वरील विषयी सविस्तर चर्चा करण्यांत आली व मे.ओमकार कन्स्ट्रक्शन यांनी द्वितीय वाटाघाटीसाठी कमी करून दिलेल्या कमी करुन दिलेल्या दरांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मान्यता देण्यांत येत असून मे.ओमकरा कन्स्ट्रक्शन यांच्याशी कामाची संविदा करण्यांस मान्यता देणेंत येत आहे. तसेच सदर कामी येणाऱ्या एकूण खर्चानुसार अंतिम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवले सूचक :- मा.श्री. प्रकाश रॉड्रीक्स** |